नवराष्ट्र
Ratnagiri-Sindhudurg | 29 May 2026 | Page 2



# टंचाईच्या काळात टँकरने पाणीपुरवठा

## विशेष पाणीपुरवठा योजनेचा प्रारंभ

▶ **रत्नागिरी (वा.)** मे महिन्याच्या कडक उन्हाळ्यात ग्रामीण भागातील अनेक गावांना पाणीटंचाईच्या तीव्र झळा सोसाव्या लागत आहेत. अशा बिकट परिस्थितीत सामाजिक बांधिलकीचे भान राखत फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि त्यांची 'सीएसआर' भागीदार असलेल्या मुकुल माधव फाऊंडेशनने रत्नागिरी जिल्ह्यातील गोळप गावाला मोठा दिलासा दिला आहे. गावात निर्माण झालेली पाण्याची भीषण टंचाई लक्षात घेऊन दोन्ही संस्थांच्या वतीने टंचाईग्रस्त भागात टँकरने पाणीपुरवठा करण्याचा कौतुकास्पद निर्णय घेण्यात आला असून, यामुळे ग्रामस्थांची पाण्यासाठी होणारी वणवण थांबली आहे. गोळप गावातील कातळवाडी, परशुराम नगर, डोंगरेवाडी, हनुमानवाडी आणि रोहिदास वाडी या पाच वाड्यांमध्ये सध्या पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण झाले होते.




## फिनोलेक्स इंडस्ट्रीजचा गोळप गावाला दिलासा

या पाणीपुरवठा मोहिमेमुळे या भागातील सुमारे १०० हून अधिक कुटुंबांचा पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न तूर्तास सुटला आहे. ऐन उन्हाळ्यात हक्काचे पाणी दारापाशी उपलब्ध झाल्याने महिला वर्गासह सर्वच ग्रामस्थांनी प्रशासनाचे मनापासून आभार मानले असून परिसरात समाधानाचे वातावरण आहे.या विशेष पाणी पुरवठा योजनेचा अधिकृत प्रारंभ बुधवारी वाडीतील मंदिरासमोर पारंपरिक पद्धतीने श्रीफळ वाढवून करण्यात आला. याप्रसंगी गोळप गावचे उपसरपंच संदीप तोडणकर, फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड व मुकुल माधव फाऊंडेशनचे वरिष्ठ प्रतिनिधी तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. संकटकाळात धावून येत गावाची तहान भागवल्याबद्दल उपसरपंचांनी व ग्रामस्थांनी फिनोलेक्स आणि मुकुल माधव फाऊंडेशनच्या या सामाजिक कार्याचा गौरव करत त्यांचे विशेष आभार मानले.